हॅलो प्रभात

# नॅक मुल्यांकनामध्ये विवेकानंद कॉलेजचे 'दैदिप्यमान यश...'

कोल्हापूर : हॅलो प्रभात

येथील श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (अधिकारप्रदत्त स्वायत्त) या महाविद्यालयास दिनांक १४ व १५ ऑक्टोबर, २०२४ रोजी नॅक 4th cycle साठी नॅक पिअर टीमने भेट दिली. या समितीचे प्रमुख संबळपूर विद्यापीठ, ओरिसाचे माजी कुलगुरु प्रोफेसर बिष्णू चरण बरीक हे होते तर समितीचे समन्वयक अलिगड मुस्लीम विद्यापीठ, उत्तरप्रदेश मधील कॉमर्स विभागप्रमुख व माजी डीन डॉ. नवाब अली खान व समितीचे सदस्य एम. जी. सायन्स इन्स्टिटयुट, अहमदाबाद, गुजरातचे प्राचार्य डॉ. भानूकुमार जैन यांचा समावेश होता.




विद्यापीठ संलग्रित महाविद्यालये आणि स्वायत्त महाविद्यालये यांच्या मुल्यांकनामध्ये वेगळेपण असते. स्वायत्त महाविद्यालयाचे मुल्यांकन हे विद्यापीठाच्या मुल्यांकनासारखे असते. अशावेळी गुणवत्ता टिकवून ठेवणेसुद्धा कठीण असते. असे असतानाही अधिकारप्रदत स्वायत असणाऱ्या विवेकानंद कॉलेजने आपल्या गुणवत्तेमध्ये वाढ करून राष्ट्रीय मुल्यांकन आणि प्रत्यायन परिषद (नॅक) च्या 4th cycle मध्ये मोठी भरारी घेऊन 3.29 CGPA सह A+ ग्रेड मिळविलेली आहे. सन २०१६ मध्ये झालेल्या नॅक 3rd Cycle मध्ये विवेकानंद कॉलेजला 3.24 CGPA सह A ग्रेड मिळालेली होती. त्यानंतर महाविद्यालयाने स्वायत होण्याचा बहुमान पटकावला होता.